# खनिज उत्खननाची उच्चस्तरीय चौकशी करा!

## शुभम परळीकर यांचे मंत्री पंकजा मुंडे यांना निवेदन

प्रतिनिधी ६ ऑगस्ट




**अमरावती :** विना रॉयल्टी रतन इंडिया कंपनीने रेल्वे ट्रॅकसाठी दहा लाख मेट्रिक टनापेक्षा जास्त मुरूम उत्खनन करून वापरला. त्यामुळे रतन इंडिया पॉवर प्रकल्पातील पर्यावरणीय, महसूल व खनिज नियमांच्या कथित उल्लंघनाची उच्चस्तरीय चौकशी करा, अशी मागणी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी मंत्री पंकजा मुंडे यांच्याकडे केली आहे.

नांदगावपेठ एमआयडीसी येथील रतन इंडिया पॉवर लिमिटेडच्या औष्णिक विद्युत प्रकल्पासंदर्भात पर्यावरणीय नियमांचे कथित उल्लंघन, फ्लाय अॅश व्यवस्थापनातील अनियमितता, हवा व पाणी प्रदूषण, हरित पट्ट्याची अपुरी अंमलबजावणी, धोकादायक कचरा व्यवस्थापन, मुरूम उत्खनन, महसूल बुडविल्याच्या तक्रारी तसेच शासनाच्या विविध परवानग्यांच्या अंमलबजावणीची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी राज्य शासन, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, एमआयडीसी व संबंधित विभागांकडे केली आहे.

परळीकर यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, प्रकल्प परिसरातील अनेक गावांतील नागरिकांकडून अनेक वर्षांपासून प्रदूषणाबाबत सातत्याने तक्रारी होत आहेत.

कोळशावर आधारित औष्णिक विद्युत प्रकल्पातून निर्माण होणारी फ्लाय अॅश, धूळ, वायू प्रदूषक, औद्योगिक सांडपाणी आणि राखेच्या व्यवस्थापनाबाबत शासनाने घालून दिलेल्या अटींचे पालन प्रत्यक्षात होत आहे का, याची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक आहे. निवेदनात सर्वात गंभीर मुद्दा म्हणून मुरूम उत्खननाचा विषय उपस्थित करण्यात आला आहे. रतन इंडिया पॉवर प्रकल्पासाठी रेल्वे ट्रॅक आणि इतर विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणात मुरूम वापरण्यात आल्याची तक्रार आहे. या संदर्भात सुमारे १० लाख घनमीटर मुरूम उत्खनन झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, त्या उत्खननासाठी आवश्यक खनिज परवाने घेण्यात आले होते का, शासनाकडे नियमानुसार रॉयल्टी जमा करण्यात आली होती का, उत्खननाची मोजणी, वाहतूक आणि महसूल नोंदी काय आहेत, याची महसूल विभाग व भूविज्ञान विभागामार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. जर चौकशीत नियमभंग किंवा रॉयल्टी न भरल्याचे निष्पन्न झाले, तर महाराष्ट्र गौण खनिज नियमांनुसार संपूर्ण रॉयल्टीची वसुली, दंडात्मक कारवाई आणि आवश्यक असल्यास फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणाची संयुक्त व निष्पक्ष चौकशी करून आवश्यक ती कारवाई करण्याची विनंती करण्यात आली आहे.

### एमपीसीबी अधिकाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी

» मागील पाच वर्षांत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) कोणत्या तपासण्या केल्या, कोणत्या त्रुटी आढळल्या, कोणत्या नोटिसा बजावल्या, दंड आकारला का, तसेच कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा झाला का, याची स्वतंत्र चौकशी करून दोषी अधिकारी आढळल्यास त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी.

### अशा आहेत मुख्य मागण्या

» युवासेना उपजिल्हाप्रमुख शुभम परळीकर यांनी एमपीसीबी, सीपीसीबी, महसूल विभाग, भूविज्ञान विभाग, एमआयडीस आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त समितीद्वारे संपूर्ण प्रकल्पाची उच्चस्तरीय चौकशी, सर्व पर्यावरणीय परवानग्यांची पडताळणी, हवा-पाणी-माती-भूजल नमुना तपासणी, सार्वजनिक सुनावणी, तपासणी अहवाल सार्वजनिक करणे आणि नियमभंग सिद्ध झाल्यास पर्यावरणीय नुकसानभरपाईसह कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# राजमाता जिजाऊ ' ही एक नवीन आणि अत्याधुनिक बस सेवा आहे - आमदार सुलभा खोडके

## महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात दाखल झालेल्या ' राजमाता जिजाऊ ' बस सेवेचे आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते लोकार्पण

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



अमरावती : एसटीच्या पारंपारीकतेला आता आधुनिकतेची जोड देण्यात आली आहे.एसटी ही ग्रामीण भागातील विशेषतः जीवनवाहिनी मानली जाते. त्यामुळे या सेवेचा लाभ शहरी भागासोबतच ग्रामीण भागातील नागरिकांना होणार आहे.राजमाता जिजाऊ ही बस सेवा सुरु झाल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची क्षमता आणि गुणवत्ता दोन्ही वाढण्याची शक्यता आहे. या बस सेवेचे नाव राजमाता जिजाऊ ठेवण्यात आले असून त्यामागे ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रेरणा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या घडणीत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या माँ जिजाऊंच्या कार्याचा सन्मान म्हणून हे नाव देण्यात आले आहे. या माध्यमातून केवळ वाहतूक सेवा नव्हे तर सांस्कृतिक मूल्यांची जपवणूक करण्याचाही प्रयत्न करण्यात आला आहे. एकंदरीत राजमाता जिजाऊ बस सेवा ही एसटीच्या आधुणुकीकरणातील एक महत्वाची पायरी ठरत असून यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिक चांगला होण्याची अपेक्षा आहे. सार्वजनिक वाहतूक अधिक सक्षम आणि आकर्षक बनवण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्वाचा ठरणार असून भविष्यात या सेवेचा विस्तार आणि प्रभाव याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. असे प्रतिपादन आमदार - सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी उपस्थितांना संबोधून केले. बुधवार दिनांक 5 ऑगस्ट 2026 रोजी अमरावती मध्यवर्ती बस स्थानक व राज्य परिवहन महामंडळाच्या आगार क्रमांक - 1 येथील परिसर स्थित राजमाता जिजाऊ बससेवा लोकार्पण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी सर्वप्रथम राष्ट्रमाता, राजमाता - माँ जिजाऊ यांच्या प्रतिमेस आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या हस्ते नमन - पूजन - वंदन करण्यासह माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर ' राजमाता जिजाऊ ' बससेवेचे त्यांनी पूजन करून फीत कापून या बससेवेच्या लोकार्पणाची औपचारिकता साधली. यावेळी राज्य परिवहन महामंडळाचे यंत्र अभियंता - नरसिंग चव्हाण तसेच आगार क्रमांक - 1 च्या व्यवस्थापक - आनंदी जयंत बेलोरकर यांनी आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. Bs - 6 लेलँड एअर सस्पेन्शन वाहन तसेच आसन क्षमता - 55 असलेल्या राजमाता जिजाऊ 3 बस आता एसटीच्या ताफ्यात दाखल झाल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थी तसेच नागरिकांना अवागमन करण्यासाठी ही उपलब्धता सुखावह ठरल्याचे चित्र यावेळी दिसून आले. या लोकार्पण कार्यक्रम प्रसंगी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अमरावती येथील यंत्र अभियंता - नरसिंग चव्हाण, विभागीय वाहतूक अधिकारी - पवन लाजूरकर, आगार क्रमांक - 1 व्यवस्थापक आनंदी बेलोरकर, हर्षल धारणे, नाजूकराव राणे, सहायक वाहतूक अधीक्षक - कमल वानखडे मॅडम यासोबतच चालक - वाहक व यांत्रिक कर्मचारी तसेच प्रवासी व विद्यार्थी प्रामुख्याने उपस्थित होते.

# जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय दर्यापूरचा नवीन इमारतीचा वर्धापन दिन थाटात साजरा

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



**दर्यापूर :** जिल्हा व अतिरीक्त सत्र न्यायालय, दर्यापूर या नवीन न्यायालयीन इमारतीस 1 वर्ष पूर्ण झाल्याचा निमीत्ताने आयोजित वर्धापन दिन सोहळ्याचे उद्घाटन दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे अध्यक्षा व प्रमुख अतिथी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जिल्हा व सत्र न्यायालय अमरावती उज्वला नंदेश्वर यांच्या हस्ते मंगळवारी पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा न्यायाधीश 1, अतिरिक्त सत्र न्यायाधीश , दर्यापूर सत्यवान डोके, जिल्हा न्यायाधीश 2 व अतिरिक्त सत्र न्यायाधीश मनिल कुमार लोकवाणी, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ दर्यापूर महेश शिलार, न्यायाधीश उदलक पाटील , न्यायाधीश आशिष जोशी, न्यायाधीश समीर कमलाकर, दर्यापूर वकील संघाचे अध्यक्ष प्रदीप शेळके,

वकील संघ कार्यकारणी मधील पदाधिकारी देवानंद पर्वतकर, अनुराधा गोमासे, लीना गहेरवाल, वैभव इंगळे, उषा अग्रवाल, आम्रपाली चौरपगार , सौरभ दिगडे, रितेश गवई आदी वकिलांची प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला नंदेश्वर यांनी मौलिक मार्गदर्शन केले. दर्यापूरच्या नवीन इमारतीचे एक वर्षापूर्वी देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई साहेब यांच्या हस्ते लोकार्पण होणे म्हणजे हा दर्यापूरचा वैभवशाली न्यायालयाचा गौरव असल्याचे उद्गार त्यांनी काढले. तसेच वकील संघाचे अध्यक्ष प्रदीप शेळके यांनी दर्यापूर न्यायालय शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, तसेच न्यायालयात अत्याधुनिक वाचनालय करण्यासंदर्भातील मागणी केली होती.

# डिजिटल श्रम संकल्प' आयडियाथॉन स्पर्धेत तरुण आणि नवोन्मेषकांना नाविन्यपूर्ण विचार मांडण्याची संधी

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**अमरावती :** केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्रालयाने 'डिजिटल इंडिया' आणि 'विकसित भारत' संकल्पनेला गती देण्यासाठी 'डिजिटल श्रमसंकल्प आयडियाथॉन' स्पर्धा जाहीर केली आहे. 'इनोव्हेट इंडिया'(MyGov) प्लॅटफॉर्मवर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत ४ सप्टेंबर २०२६ पर्यंत सायंकाळी ५.४५ वाजेपर्यंत जिल्ह्यातील विद्यार्थी, तंत्रज्ञान व्यावसायिक,स्टार्टअप्स, उद्योजक आणि आयआयटीएन्सना नाविन्यपूर्ण विचार मांडण्याची संधी मिळणार आहे.

या उपक्रमांतर्गत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय),डेटा अॅनालिटिक्स आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून 'ई-श्रम' नॅशनल करिअर सर्विस आणि श्रम सुविधा पोर्टल २.० अधिक मजबूत आणि प्रभावी करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे. या माध्यमातून कामगार कल्याण, रोजगार सेवांचा विस्तार आणि सरकारी नियमांचे पालन अधिक सोपे करण्याचा सरकारचा मनोदय आहे. असे होता येणार सहभागी या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इनोव्हेट इंडिया'(MyGov) प्लॅटफॉर्मवर, तसेच ,https://innovateindia.mygov.in/digital-shram-sankalp वर नोंद करता येणार आहे. सर्वोत्तम कल्पनेसाठी आकर्षक पारितोषिके स्पर्धेत मांडण्यात आलेल्या प्रत्येक समस्येच्या निदानासाठी निवडलेल्या पहिल्या ५ सर्वोत्तम कल्पनांना आकर्षक रोख रकमेच्या पारितोषिकांनी गौरविण्यात येईल. तसेच सर्व पात्र सहभागींना मंत्रालयाकडून अधिकृत 'डिजिटल प्रमाणपत्र' प्रदान करण्यात येईल. विजेत्या संघांना किंवा व्यक्तींना श्रम व रोजगार मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर थेट कल्पना सादर करण्याची संधी मिळणार आहे. स्पर्धेत निवड झालेल्या संकल्पनेचा प्रत्यक्ष सरकारी पातळीवर पथदर्शी प्रकल्प म्हणून समावेश करण्यात येऊ शकतो.

श्रम परिसंस्था अधिक पारदर्शक आणि समावेशक बनविण्यासाठी तरुण आणि नवसंशोधकांनी या स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# महानगरपालिकेत साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**अमरावती :** शनिवार दिनांक १ ऑगस्ट,२०२६ रोजी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्य हारार्पण कार्यक्रम अमरावती महानगरपालिकेत संपन्न झाला. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती निमित्य मा.महापौर श्रीचंद तेजवानी यांचे हस्ते अण्णाभाऊ साठे यांचे प्रतिमेस हारार्पण विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृह येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमास स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, नगरसेवक मिलींद बांबल, संजय तिरथकर, उपायुक्त योगेश पिठे, शहर अभियंता श्रीधर कांबळे, सहाय्यक आयुक्त भुषण पुसतकर, अभियंता आनंद जोशी, भास्कर ढेवले, हरीष संतोसिया, दिनेश देशमुख, प्रमोद मोहोड, गणेश काकडे, भुषण खडेकार, अखिलेश खडेकार, मंदार नानोटी, शिवा फुटाणे, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# खामगाव-चिखली मार्गावरील गतिरोधक त्रासदायक!





प्रतिनिधी ६ ऑगस्ट

## अतांत्रिक रचनेमुळे वाहनचालक संतप्त

**खामगाव :** चिखली मार्गावरील काही गतिरोधकांच्या अतांत्रिक रचनेमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. गतिरोधकां मधील असमतोल अंतर आणि उंचीमुळे वाहनांना तीव्र धक्के बसत असून, दुचाकीस्वार, चारचाकी चालक, रुग्णवाहिका तसेच ज्येष्ठ नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. संबंधित विभागाने या गतिरोधकांचे तांत्रिक परीक्षण करून आवश्यक सुधारणा कराव्यात, अशी मागणी होत आहे. मार्गावरील केवळ तीन समांतर पट्ट्यांचे गतिरोधक तुलनेने योग्य पद्धतीने उभारण्यात आले आहेत. मात्र, उर्वरित दोन पट्ट्यांच्या गतिरोधकांतील अंतर याबाबत कोणतेही तांत्रिक नियोजन दिसून येत नाही. दोन गतिरोधकांमधील असमतोल अंतरामुळे दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, चारचाकी वाहनचालक तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहनांना सतत धक्के बसत असल्याने कंबरदुखी, मणक्यांचा त्रास आणि इतर शारीरिक व्याधींमध्ये वाढ होत असल्याचीही तक्रार नागरिक करीत आहेत. विशेष म्हणजे, हे गतिरोधक उभारल्यानंतर काही स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्याचे श्रेय घेण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. मात्र, आज त्याच गतिरोधकांच्या अतांत्रिक बांधकामामुळे नागरिक त्रस्त झाले असून, या गैरसोयीची जबाबदारी स्वीकारण्यास कोणीही पुढे येत नाही. लोकांच्या सुरक्षिततेच्या नावाखाली केलेले हे काम अखेर नागरिकांच्या डोकेदुखीचे कारण ठरले आहे. गतिरोधकच वाहनचालकांच्या गैरसोयीचे कारण ठरत असल्याने संबंधित यंत्रणेने याकडे लक्ष देण्याची गरज व्यक्त होत आहे.

### अन्यथा रोष वाढणार !

» सार्वजनिक निधीतून होणाऱ्या अशा कामांमध्ये तांत्रिक निकषांची पायमल्ली होत असेल, तर संबंधित विभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. प्रशासनाने तातडीने दोषपूर्ण गतिरोधक दुरुस्त करावेत; अन्यथा, अपघात आणि नागरिकांचा रोष दोन्ही वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

### कंबरदुखी, मणक्याच्या त्रास वाढला!

» खामगाव-चिखली मार्गावरील अव्यवस्थित गतिरोधकांमुळे वाहनचालकांना कंबरदुखी, मणक्यांचा त्रास यासारख्या शारीरिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. गतिरोधकांमधील असमतोल अंतरामुळे दुचाकीस्वार, रुग्णवाहिका, ज्येष्ठ नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असून, नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी आहे.

# वायुवेग पथकाच्या तत्परतेने सर्पदंश झालेल्या शेतकऱ्याचा वाचला जीव!

प्रतिनिधी ६ ऑगस्ट



## प्रसंगावधान राखत रुग्णालयात केले भरती

**खामगाव :** उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाच्या तत्परतेमुळे सर्पदंश झालेल्या शेतकऱ्याचे प्राण वाचवण्यात यश आले. मंगळवारी सकाळी सहायक मोटार वाहन निरीक्षक संदीप ठाकूर आणि अमोल सरकते यांनी प्रसंगावधान दाखवत शेतकरी संदीप वानखेडे यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल केले. मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी सकाळी सुमारे ११.३० वाजता खामगाव उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वायुवेग पथक नियमित कामकाजासाठी खामगावहून शेगावकडे जात होते. जयपूर लांडे फाट्या जवळील सिद्धिविनायक कॉलेज परिसरात रस्त्याच्या कडेला एक शेतकरी वेदनांनी विव्हळत असल्याचे सहायक मोटार वाहन निरीक्षक संदीप ठाकूर आणि अमोल सरकते यांच्या निदर्शनास आले.

त्यांनी तत्काळ वाहन थांबवून चौकशी केली असता, संबंधित शेतकऱ्याचे नाव संदीप वानखेडे असून त्यांना सर्पदंश झाल्याचे समजले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सहायक मोटार वाहन निरीक्षक संदीप ठाकूर, अमोल सरकते, तसेच चालक मुंढे यांनी कोणताही विलंब न करता शासकीय वाहनातून वानखेडे यांना तातडीने शासकीय रुग्णालय, खामगाव येथे दाखल केले. वायुवेग पथकाच्या तत्परता, प्रसंगावधान आणि मानवतावादी भूमिकेमुळे वेळेत उपचार मिळाल्याने शेतकरी संदीप वानखेडे यांचे प्राण वाचले. या कार्याबद्दल उपस्थित नागरिकांनी वायुवेग पथकाचे कौतुक केले.

# लग्नाचे आश्वासन देऊन महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**मलकापूर:** लग्नाचे आश्वासन देऊन महिलेवर वारंवार लैंगिक अत्याचार तसेच जिवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी ३८ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस स्टेशनला एका विरूध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक एका नगरातील ३८ वर्षीय महिलेने दिलेल्या तक्रारी तक्रारीत नमूद केले आहे की, आरोपी आकाश राजू टाक (वय ३५) रा.रामदेव बाबा नगर, मलकापूर याने ५ ऑगस्ट २०२४ पासून २५ मे २०२६ या दरम्यान लग्न करण्याचे आश्वासन देत शारीरिक संबंध ठेवण्याचा दबाव टाकला.

याला विरोध केला तरीही त्याने इच्छेविरुध्द जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवले. या विरोधात पोलिसांत तक्रार करण्याचे सांगितले असता आरोपीने लग्न करण्याचे व त्याचे पत्नीला घटस्फोट देण्याचे व फिर्यादीला नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन दिले. त्याच्यावर विश्वास ठेवला आणि तात्काळ तक्रार केली नाही. आरोपी वारंवार लग्नाचे आश्वासन देत राहीला, व शारीरिक संबंध ठेवण्यासाठी दबाव टाकत राहिला तसेच वारंवार लग्नाचे आश्वासन देऊन वारंवार शारीरीक संबंध ठेवले असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. मी २५ मे रोजी दवाखान्यात तपासणी केली असता अडीच महिन्यांची गर्भवती असल्याचे समजले. त्यावेळी आरोपीला सांगितले असता त्याने लग्नास नकार देत अपमान करून शिवीगाळ केली व माझ्या चारित्र्यावर संशय घेतला, 'हे मूल माझे नाही' असे सांगुन माझी बदनामी केली. तसेच पैसे देण्याची तयारी दर्शवली. तेव्हा त्यास नकार दिल्यानंतर त्याने मला जिवे मारण्याची धमकी दिली. महिलेने शहर पो.स्टे.ला दिलेल्या तक्रारीवरून अपनं ५६६/२०२६ कलम ६९,३५६(२),३५२,३५१(२) बीएनएसएस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक प्रशांत झेंडगे करीत आहेत.

# नोकरीचे आमिष; बनावट नियुक्तिपत्र देत 6.5 लाख रुपयांची फसवणूक!

प्रतिनिधी ६ ऑगस्ट

**जळगाव जामोद:** पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल प्रतिनिधी जळगाव जामोद रेल्वेत नोकरी लावून न्याय देण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्तीपत्र पाठवून तालुक्यातील आसलगाव येथील एका शेतकऱ्याकडून तब्बल ६ लाख ५० हजार रुपये उकळल्याचा प्रकार ५ ऑगस्ट रोजी उघडकीस आला आहे. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध भारतीय संहिताअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आशिष प्रल्हाद जाधव (३८, रा. आसलगाव, ता. जळगाव जामोद) यांच्या फिर्यादीवरून ब्रिजमोहन शंकरलाल सराटे (रा. कल्याण, जि. ठाणे) याच्याविरुद्ध गन्हा दाखल करण्यात आला आहे.

**नोकरी न देता आर्थिक फसवणूक !**

फिर्यादीनुसार, आरोपीने रेल्वेत नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देत फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर रेल्वेचे बनावट नियुक्तीपत्र पाठवून वेळोवेळी एकूण ६ लाख ५० हजार रुपये स्वीकारले; मात्र प्रत्यक्षात कोणतीही नोकरी न देता आर्थिक फसवणूक केल्याचे समोर आले. ही घटना १५ सप्टेंबर २०२४ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत घडल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३३६ (३) व ३४० (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिस उपनिरीक्षक नागेश खाडे हे पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास करीत आहेत.

**आमिषाला बळी पडू नये!**

नोकरी मिळवून देण्याच्या आमिषाला बळी पडू नये, कोणालाही पैसे देण्यापूर्वी भरती प्रक्रियेची आणि संबंधित कागदपत्रांची खातरजमा करावी. अशा प्रकारची फसवणूक झाल्यास तत्काळ पोलिसांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय श्री छत्रपती शिवाजी महाराज नगर परिषद काम्पलेक्स, रेल्वे स्टेशन समोर खामगाव येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135